# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २५/०८/२०२२ (गुरूवार)

---

.

## जनावरांना अवैधरित्या वाहतुक करणा—यां आरोपीतांना अटक

पोलीस स्टेशन कन्हान :— अंतर्गत सत्रापुर रेल्वे फाटक जवळ कन्हान तह पारशिवनी ०.५ किमी दक्षिण. येथे दिनांक २३/०८/२०२२ चे २१/३० वा ते २२/०० वा दरम्यान, यातील आरोपीने वाहन क्र. एम.एच.—४०—बी.जी.—३२६१ मध्ये अवैद्यरित्या जनावराची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन **दोन गाय कि १०,०००/—रू प्रमाणे तसेच ७ गोरे ५६,०००/—रू असा एकुण ६६,०००/—रू तसेच टाटा कंपनीची योद्धा वाहन क्र MH ४० BG ३२६१ कि ५,००,०००/—रू असा एकुण ५,६६,०००/—रू चा माल** जप्त करून ताब्यात घेतले व सदर गाई व गोरे चारा पाण्याची व्यवस्था करण्याकरीता गौशाळा कल्याणकारी संस्था खैरी पिंपळगांव तह लाखनी जि भंडारा येथे जमा केले आहे. यातील आरोपी हा वाहन मध्ये २ गाई ७ गोरे यांना निर्दयतेने कोंबुन यांची वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यांचे विरूद्ध सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे नापोशी राजेंद्र मुलचंद गौतम पोस्टे कन्हान यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपी नामे— १)जावेद खान अबिस खान वय ३१ वर्ष २) आफताब समिम खान वय १९ वर्ष दोन्ही रा पुराना भोईपुरा कामठी यांचे विरूध्द कलम 11(1),11(1)(A),11(1)(D),11(1)(E),11(1)(F),11(1)(I) प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनियम ५(अ)(ब) महा.प्रा.सं(सुघारणा) अधि, ११९ महा. पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयातील आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढील तपास— पो हवा अरूण सहारे पोस्टे कन्हान मो.क्र ३०९५९२५१२ हे करीत आहे.

## चोरी

पोलीस स्टेशन वेलतूर :— अंतर्गत मौजा कुजबा १२ कि.मी. पश्चिम, यातील फिर्यादी हे आंभोरा देवस्थान येथे गेले असता, दिनांक १७/०८/२०२२ चे १२/०० वा. ते २३/०८/२०२२ चे १८/३० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात ईसमाने घराचे वर असलेल्या धाब्याचे खुल्या दरवाज्यामधून आतमध्ये प्रवेश करून गोदरेजच्या आलमारीचे आतमधील छोट्या ड्रावरमध्ये ठेवलेला **१ सोन्याचा १२ ग्रॅमचा गोप किंमती ६०,०००/—रू. व नगदी १,५००/—रू. असा एकुण ६१,५००/—रू. चा माल** चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नितीन दिलीप बोरकर वय ३२ वर्ष रा. कुजबा, ह.मू. नागपूर यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वेलतुर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पो.हवा. मधुकर सुरपाम पो.स्टे. वेलतूर हे करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणारा आरोपी अटकेत

**पोलीस स्टेशन सावनेर** :– अंतर्गत वडार मोहल्ला वार्ड क्र १७ सावनेर, यातील घटना दिनांक ०१.०८.२०२२ रोजी ११.०० वा. सूमारास, यातील फिर्यादीचे घरी कोणीही नसताना, यातील आरोपी नामे– मोहम्मद शकिल अन्सारी  वय ४० वर्ष, रा. मच्छी मार्केट जवळ, बाजार चौक सावनेर हा फिर्यादीचे घरी येवून फिर्यादीची अल्पवयीन मूलगी वय १७ वर्ष हिला फूस लावून पळवून नेल्याचे माहीत झाले असता, फिर्यादी हे  दिनांक २४/८/२०२२ रोजी सायंकाळी ०७/३० वा चे दरम्यान अल्पवयीन मूलीला घेण्यासाठी आरोपीचे घरी गेली असता, आरोपीने फिर्यादी हीला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपी नामे– मोहम्मद शकिल अन्सारी वय ४० वर्ष, रा. मच्छी मार्केट जवळ, बाजार चौक सावनेर यांचे विरूध्द कलम ३६३,३६६(अ),३५४, ५०४, ५०६ भादवी सहकलम ८, १२, पोक्सो कायदा अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास– मसपोनि रासकर पोस्टे सावनेर मो. ९०८२१९६०८० हे करीत आहे

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :–अंतर्गत धवळपेठ शिवार १२ किमी पश्चिम, यातील मृतक हा दिनांक २३.०८.२२ चे २२.०० वा दरम्यान त्याची मोटर सायकल क्र एम एच ४५ बी डी २४७६ नी नागपुर वरून सिंधी रेल्वे येथे घरी जात असता,यातील अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरभाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकाचे मोटर सायकल ला धडक मारून गंभीर जखमी करून मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अजीज अब्दुल बारी कुरेशी वय ४२ वर्ष रा सिधी रेल्वे जि वर्धा यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम २७९,३०४ (अ) भादवी १८४ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास–पोलीस उपनिरीक्षक श्री पालीवाल मो क्र  ९९२१३३७२८८ हे करीत आहे.

## बॅटरी चोरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :–अंतर्गत येणीकोणी शिवारातील भारत संचार निगम लिमिटेड चे टॉवर, येथे दिनांक १८/०८/२०२२ रोजी रात्री ०२/०० वा ते ०२/३० वा सुमारास येणीकोणी शिवारातील भारत संचार निगम लिमिटेड चे टॉवर मधिल १८० मी लांबीचा आर एफ केबल किमंत अंदाजे १५,०००/–रू, व अमर राजा कंपनीचा ४०० एएच च्या २४ बॅटरी ज्याची किमंत  १०,०००/–रू चा असा एकुण २५,०००/–रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कमलेश भास्करराव तभाने वय ४४ वर्ष रा नरखेड यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन नरखेड येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास–– पो हवा प्रकाश खोपे मो क्र ९८८१५८२४७१ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष नागपूर**
**जिल्हा (ग्रामीण),नागपुर**